महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

*कालमर्यादा : २९/०१/२०२५.*

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/पदोन्नती/२०२४/ 248 दिनांक : 22 JAN 2025

**परिपत्रक :**

**विषय :- गट क मधील कनिष्ठ लिपीक / लिपीक टंकलेखक हे पद पदोन्नतीने भरणेबाबत..**

संदर्भ : (१) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक टंलेप्र १०८१/सीआर-३४४/२०-ब, दिनांक ०६/०५/१९९१.

(२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्रमांक आरटीआर २०१४/प्र.क्र.३५५/१२, दिनांक ०६/०६/२०१७.

(३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०२३/प्र.क्र.१/कार्यासन १२, दिनांक १२/०१/२०२३.

या कायार्लयाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्था / कार्यालयांमधील **कनिष्ठ लिपीक / लिपीक टंकलेखक हे पद " ज्येष्ठता अधिन पात्रता "** विचारात घेऊन पदोन्नतीने भरावयाचे आहे. सदर पदासाठी वेतनश्रेणी व आवश्यक अर्हता खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | पदोन्नत पदाचे पदनाम, वेतनश्रेणी व पद संख्या | ज्या संवर्गातून पद भरावयाचे आहे त्याचा संवर्ग | आवश्यक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ०१ | कनिष्ठ लिपीक / लिपीक टंकलेखक. (वेतन स्तर – एस ६ : १९९०० – ६३२००) (०५ पदे) | गट – ड मधील पदे | १) गट ड मधील पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण.<br>२) सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता.<br>३) मराठी टंकलेखन वेग किमान ३० श. प्र. मि. व इंग्रजी टंकलेखन वेग किमान ४० श. प्र. मि. शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र आवश्यक.<br>४) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत. (मागासवर्गीयांसाठी) |

आपल्या संस्थेतील गट ड मधील जे कर्मचारी सदर पदासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करीत असतील त्यांची माहिती खालील प्रपत्रामध्ये भरुन दिनांक **२९/०१/२०२५ पर्यंत** या कार्यालयास त्यांचे **अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतींसह** सादर करावी.

| अ. क्र. | कर्मचा-याचे संपूर्ण नांव | पदनाम | प्रवर्ग व जात | जन्म दिनांक | मूळ नेमणूक दिनांक | शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झाल्याच्या वर्षासह) | जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त केले आहे किंवा कसे ? | शिस्तभंग विषयक कार्यवाही / प्राथमिक चौकशी चालू आहे / नाही | संगणक परीक्षा उत्तीर्ण आहेत किंवा कसे ? | शेरा / अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १२ | १३ |

कर्मचा-यांचे संस्थेतील उपलब्ध अभिलेख व सेवापुस्तके यामधील नोंदींवरुन, तसेच कर्मचा-यांकडून त्यांची शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे, दाखले इत्यादी घेऊन तपासावीत व माहिती या कार्यालयास सादर करावी.

सदर पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. त्याच प्रमाणे सदर पदावर नियुक्त केलेल्या व्यक्ती या विभागांतर्गत कोणत्याही शासकीय संस्थेत बदलीस पात्र ठरतील.

त्याच प्रमाणे आपल्या संस्थेतील संबंधित कर्मचा-यांची माहिती या कार्यालयास प्राप्त न झाल्यास, तसेच पाठविलेल्या माहितीमध्ये कांही त्रुटी आढळल्यास त्यास सर्वस्वी संबंधित कर्मचा-यांना जबाबदार धरण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी., तसेच सदरचे परिपत्रक आपल्या संस्थेतील सर्व संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून त्याची पोहोच घ्यावी व पुढील कार्यवाही करावी. सदर माहिती **दिनांक २९/०१/२०२५ पर्यंत** या कार्यालयास सादर करावी.

***संस्थेत प्राप्त अर्जाची संस्था स्तरावरच पडताळणी करुन, सदर कर्मचारी पदोन्नतीच्या पदासाठी आवश्यक अर्हता धारण करीत असेल, तरच अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह (साक्षांकित छाया प्रतींसह) या कार्यालयास सादर करावेत. अपूर्ण व अपात्र कर्मचा-यांचे अर्ज सादर करु नयेत.***

संस्थेमध्ये मधील कर्मचारी उपलब्ध नसल्यास किंवा पदोन्नतीसाठी अर्ज करण्यास इच्छूक नसल्यास **'निरंक'** अहवाल सादर करण्यात यावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था प्रमुख यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याकरिता.